# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

## ४१२-ई, शिवाजीनगर, पुणे- ४११ ०१६.

☎ २५६५६२३४ Email:ropune@dtemaharashtra.gov.in Web Site :- www.ropune.org.in


जा. क्र. तंशिविकापु/विवि/DBT २०१८-१९/ ४२१८ दिनांक :- २९/०९/२०१८

प्रति,
संचालक/प्राचार्य,
सर्व तंत्रशिक्षण संस्था,
पुणे विभाग

विषय :- DBT PORTAL मध्ये INSTITUTE PROFILE APPROVE करणे बाबत....

संदर्भ :- १. तंत्रशिक्षण संचालनालयाचे पत्र क्र १८/तंशिस/ईबीसी/डीबीटी पोर्टल/२०१८/३२० दिनांक १९/०९/२०१८
२. सहसंचालक यांचा इमेलवरील आदेश.
३. जा. क्र. तंशिविकापु/विवि/DBT २०१८-१९/४०८७ दिनांक १९/०९/२०१८

पुणे विभागातील सर्व तंत्रशिक्षण संस्थांच्या संस्थाप्रमुखांना सुचित करण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करीता तंत्रशिक्षण संचानालयामार्फत राबविण्यात येणा-या १. राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना २. डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भता योजना ३.राज्य सरकारची अल्पसंख्यांक योजना या तीन योजनांचा समावेश DBT PORTAL मध्ये करण्यात आला आहे.

या अनुषंगाने सर्व संस्थांना लॉगीन आयडी व पासवर्ड ईमेलद्वारे पाठविण्यात आले आहेत. तसेच सर्व संस्थांनी http://mahadbtmahait.gov.in/ या वेब पोर्टलवर लॉगीन करुन संस्थेचे प्रोफाईल/ शुल्क बाबतची माहिती त्वरीत अद्ययावत करण्याबाबत यापुर्वीच दिनांक १९/०९/२०१८ रोजी या कार्यालयाने सुचित केलले होते. परंतु अदयापपर्यंत काही संस्थांचे प्रोफाईस उदयावत करण्याचे काम अपूर्ण राहील्याचे दिसून येत आहे. वरिष्ठ कार्यालयाच्या आदेशाप्रमाणे सर्व काम सोमवार दिनांक १/१०/२०१८ रोजी सांयकाळी ५ वाजेपर्यत पूर्ण करावयाचे आहे.

या अनुषगाने सर्व संस्थाना सुचित करण्यात येते की, संस्थांचे प्रोफाईल /शुल्काबाबतची माहिती (सर्व शुल्क व परीक्षा शुल्क ) तपासणीसाठी खालील वेळापत्रका प्रमाणे नेमुन दिलेल्या तारखेस आवश्यक कागदपत्रांसह(AICTE EOA,University/MSBTE Exam.Fee Circulars ets) उपस्थित राहुन विभागीय कार्यालयाच्या प्रतिनिधीकडून प्रोफाईल/शुल्काबाबतची माहिती ऑनलाईनरित्या मंजुर करुन घ्यावी. तसेच आपल्या संस्थेमधील ई.बी.सी मिळण्यास पात्र सर्व विद्यार्थ्याचे अर्ज संस्थास्तरावर सर्व कागदपत्रांसह तयार ठेवावेत.

| अ.क्र | संस्थांचे विवरण | तपासणीचा दिनांक | तपासणी साठी उपस्थित राहण्याचे ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | पुणे जिल्हयातील सर्व संस्था | दिनांक २९, ३० ते ०१/१०/२०१८ दिनांक ३०/०९/२०१८ सहीत | पी.ई.एस. सोसायटीचे मॉर्डन अभियांत्रिकी महाविद्यालय ,चौथा मजला संगणक प्रयोगशाळा , शिवाजीनगर पुणे-५ |
| २ | सातारा जिल्हयातील सर्व संस्था | दिनांक ३०/०९/२०१८ | |
| ३ | सांगली जिल्हयातील सर्व संस्था | | |
| ४ | कोल्हापूर जिल्हयातील सर्व संस्था | | |
| ५ | सोलापूर जिल्हयातील सर्व संस्था | दिनांक ०१/१०/२०१८ | |

**( या पूर्वी विभागीय कार्यालयाच्या प्रतिनिधीकडून प्रोफाईल/शुल्काबाबतची माहिती ऑनलाईन मंजुर करुन घेतली असेल तर सदर संस्थेने उपरोक्त दिनांकास विभागीय कार्यालयास येण्याची आवश्यकता नाही )**

विहित वेळेत याबाबतची कार्यवाही पुर्ण न केल्यास आपल्या संस्थेतील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे अर्ज भरता येणार नाहीत याची कृपया नोंद घ्यावी.

प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,पुणे

प्रत :- प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे मॉर्डन अभियांत्रिकी महाविद्यालय शिवाजीनगर पुणे - ५